# भूवैकुंठ पंढरी । तशीच जेजूरी

कानडा विठ्ठल आणि कानडा मल्हारी ही दोन्ही दैवते म्हणजे महाराष्ट्र आणि कर्नाटकाला जोडणारा सांस्कृतिक अनुबंध, चैत्र-वैशाखात खंडोबाच्या विविध ठाण्यांच्या यात्रा-जत्रा सुरू असतात. यात्रा आणि जत्रेत एक प्रमुख फरक असतो. देवाला गोडाचं जेवण दाखवितात. कीर्तन सप्ताह आयोजित होतात त्या यात्रा आणि जेथे देवाचा सामिष नैवेद्य असतो आणि तमाशाचा फड रंगतो ती जत्रा! चैत्र-वैशाखात कानडया मल्हारीच्या जत्रा महाराष्ट्र आणि कर्नाटकात सुरू असतात लागलीच आषाढात माऊलीच्या दुधासारख्या पर्जनधारा बरसू लागतात. आकाशात घननिळे अन् सावळया विठ्ठलाचे वेध त्याच काळात वारकऱ्यांना लागतात. पंढरीची यात्रा आषाढात अबिर गुलालांच्या राशीत रंगते. इकडे मल्हारीचा भंडारा आणि तिकडे विठ्ठलाचा गोपीचंद-बुका. मल्हारीचे निशान पिवळे तर विठ्ठलाचे निशान भगवे. मल्हारीचा लोकदैवत संप्रदाय तर विठ्ठलाचा भक्तीसंप्रदाय. विठ्ठल आणि मल्हारी म्हणजे खंडोबा यांची तुलना करणारे अतिशय सुंदर पद दगडूबाबा साळी यांनी रचले आहे. दगडूबाबा साळी कलगी पक्षाचे रचनाकार. ते स्वत: खंडोबाचे भक्त होते. यात्रा-जत्रांचा मोसम सुरू असताना दगडूबाबा साळी यांच्या या रचनेची प्रकर्षाने आठवण होते. ते पद पाहा-

भू वैकुंठ पंढरी । तशीच जेजूरी असे सांगती

तेथे राही रखुमाबाई । येथे बाणाई म्हाळसा सती।

तेथे बुक्याचे भूषण । येथे उधळण भंडार किती

तेथे पुंडलिक सगुण । येथे प्रधान हेगडेपती

तेथे भीमा चंद्र यात्रा । येथे कऱ्हा गंगा भक्तजन येती

तेथे टाळ, मृदुंग वीणा। येथे घण घणा धाटी गर्जती

या पदामधून महाराष्ट्राच्या भक्ती संप्रदाय आणि लोकदैवत संप्रदाय यांचे अतिशय मनोहर दर्शन घडते. श्री विठ्ठलाच्या दिंडया-पालख्या आळंदीहून निघतात तेव्हा सासवड, जेजूरी

मार्गेच पंढरीला जातात. जेजूरीला पालख्यांचा मुक्काम असतो तेथे रात्री टाळ-मृदुंगाचा गजर सुरू असतो आणि घोळ, कोटंबा, दिमडी घेतलेल्या वाघ्या-मुरळयांचे जागरण देखील रंगलेले असते. विठ्ठलाचा नामजागर आणि जागरण जेजूरीच रंगते. एका परीने हे 'हरी' आणि 'हर' यांचेच नामजागरण असते कारण 'हर' म्हणजे शंकर. शंकराचा अवतार खंडोबा या दोन्ही दैवतांची मोहिनी महाराष्ट्र आणि कर्नाटकातील जनमानसावर अद्यापही कायम आहे.

<u>प्रा.डॉ. प्रकाश खांडगे</u>